(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)
एस.सी.सी. ऑनलाईन वेब आवृत्ती, © २०२३ ईबीसी पब्लिशिंग प्राइवेट लिमिटेड
पृष्ठ १ शनिवार, २९ एप्रिल २०२३
मुद्रित : श्री. गोस्वामी यशवंत ए. ५२० यांच्यासाठी
एस.सी.सी. ऑनलाईन वेब आवृत्ती : http://www.scconline.com
खरे मुद्रण टी. एम. स्त्रोत : महाराष्ट्र लॉ जर्नल, २०२३ जर्नल पब्लिकेशन्स , नागपूर.



महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, नियम ३६

**[पूर्ण न्यायपीठ]**

(न्यायमूर्ती व्ही. सी. डाग, ए. पी. लवांडे आणि ए. बी. चौधरी )

राष्ट्रीय शिक्षण संस्था, नागपूर आणि इतर ................ याचिकाकर्ते

- विरुद्ध-

महेंद्र, पुत्र बाबुराव जामकर आणि इतर ................ उत्तरवादी

**(अ) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, नियम ३६(२)(ब)(i):-** मुख्याध्यापकाच्या बाबतीत, त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचा अधिकार असेल किंवा नसेल, नियम ३६(२)(ब)(i) मध्ये पूर्वकल्पना दिल्याप्रमाणे, 'व्यवस्थापनाचा अध्यक्ष' हा चौकशी समितीचा एक सदस्य असेल.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, यातील नियम ३६(१)(अ) अन्वये कर्मचाऱ्यांच्या संदर्भात चौकशी समिती स्थापन करण्याची तरतूद आहे, तर नियम ३६(२)(ब) अन्वये मुख्याध्यापकासाठी चौकशी समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. जर असे गृहीत धरले की, मुख्य कार्यकारी अधिकारी नसलेल्या मुख्याध्यापकाच्या बाबतीत, व्यवस्थापनाच्या अध्यक्षास चौकशी समितीचा सदस्य

रिट याचिका क्र. ७२२/२००६ आणि ६१६२/२००५, निर्णयाचा दिनांक : ०६-०४-२००७ (नागपूर)

असण्याची आवश्यकता नाही, तर नियम ३६(२)(ब) अन्वये मुख्याध्यापकासाठी स्वतंत्र चौकशी समितीची तरतूद करणे व्यर्थ ठरेल. जर असे निर्वचन स्वीकारले गेले असेल, तर नियम ३६(२)(अ) च्या प्रयोजनार्थ शाळेचे मुख्याध्यापक एक कर्मचारी असतील आणि कलम ३६(२)(ब) च्या अनुसार स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करण्याची गरज नव्हती. त्यामुळे मुख्याध्यापकाच्या बाबतीत, त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अधिकार प्रदान केले गेलेले असतील किंवा नसतील, १९८१ च्या नियमावलीच्या नियम ३६(२)(ब)(i) मध्ये पूर्व कल्पना दिल्याप्रमाणे 'व्यवस्थापनाचा अध्यक्ष' हा चौकशी समितीचा एक सदस्य असेल. (परिच्छेद १८ आणि १९)

**(ब) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, नियम२(क) :-** मुख्य कार्यकारी अधिकारी हा व्यवस्थापक वर्गाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकार दिलेली व्यक्ती असली पाहिजे (परिच्छेद १४).

**(क) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, नियम ३६(२)(ब) :-** जेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचा अधिकार असलेल्या मुख्याध्यापकांना आरोपांचे विवरणपत्र जारी करणे आवश्यक असते, तेव्हा ते व्यवस्थापनाच्या अध्यक्षांनी जारी केले पाहिजे. तथापि, अशा मुख्याध्यापकांना व्यवस्थापनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचा अधिकार नसल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी आरोपांचे विवरणपत्र जारी करू शकतात(परिच्छेद १६). २००६ चे रिट याचिका क्र. ७२२ मध्ये :

याचिकाकर्त्यांसाठी : श्री. बी. जी. कुलकर्णी

उत्तरवादी क्र. १ साठी : श्री. प्रशांत गोडे

उत्तरवादी क्र. २ साठी : श्रीमती भारती डांगरे, सहाय्यक सरकारी वकील

२००५ चे रिट याचिका क्र. ६१६२ मध्ये :

याचिकाकर्त्यासाठी : श्री. आनंद परचुरे

उत्तरवादी क्र. १ साठी : श्री. ए. झेड. जिभकाटे,

उत्तरवादी क्र. २ साठी : श्रीमती भारती डांगरे, सहाय्यक सरकारी वकील

संदर्भित प्रकरणांची यादी :

१. कंकूबाई श्रविकाश्रम ट्रस्ट आणि इतर - विरुद्ध- कमल जवजे दत्तात्रय खजूरकर आणि इतर, १९९२ महा. एल. जे. २१६ (परिच्छेद क्र. ३,७)

२. श्री. गोविंद बाळ मंदिर शिक्षण संस्था -विरुद्ध- सुहास दत्तात्रय कोगेकर आणि इतर, १९८८ (II) सी. एल. आर. १ (परिच्छेद क्र. ३,६,८)

३. फकीर मोहम्मद (मय्यत), कायदेशीर वारसाद्वारे - विरुद्ध- सीता राम, (२००२) १ एस. सी. सी. ७४१ (परिच्छेद क्र.१२)

४. गुरुदेव दत्ता व्ही. के. एस.एस. एस. मर्यादित आणि इतर -विरुद्ध- महाराष्ट्र राज्य आणि इतर, (२००१) ४ एस.सी.सी. ५३४ (परिच्छेद क्र.१२)

५. मेसर्स हिरालाल रतनलाल - विरुद्ध- विक्रीकर अधिकारी, विभाग III, कानपुर, ए.आई. आर. १९७३ एस. सी. १०३ (परिच्छेद क्र. १३)

६. उत्कल कॉंट्रॅक्टर्स अँड जॉइनरी प्रायव्हेट लिमिटेड - विरुद्ध- ओडिशा राज्य, ए.आई. आर. १९८७ एस. सी. १४५४ (परिच्छेद क्र. १८)

**न्यायनिर्णय**

**न्यायमूर्ती ए. बी. चौधरी :-** रिट याचिका क्र. ७२२/२००६ आणि ६१६२/२००५ मध्ये, या न्यायालयाच्या सन्माननीय एकल न्यायाधीशांना असे आढळून आले की, या न्यायालयाच्या दुहेरी खंडपीठांनी, मुख्याध्यापकाच्या विरुद्ध शिस्तभंगाची चौकशी करण्याच्या हेतूने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ (थोडक्यात, म. खा. शा. क. नियमावली) यातील नियम २ (क) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे 'शाळेचे मुख्याध्यापक हे मुख्य कार्यकारी अधिकारी (मु.का. अ.) आहेत की नाही' याबद्दल भिन्न मते दिली आहेत. या भिन्न मतांच्या पार्श्वभूमीवर, सन्माननीय एकल न्यायाधीशाने दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या आदेशाद्वारे निर्णय दिले की, सदर मुद्द्यावर या न्यायालयाचे परस्परविरोधी निर्णय असल्यामुळे, कायदेशीर स्थिती मोठ्या खंडपीठाद्वारे निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार, कागदपत्रे माननीय सरन्यायाधीशांच्या समोर ठेवण्यात आली होती, ज्यांनी पूर्ण खंडपीठ स्थापन करण्यास संमती दिली. त्यामुळेच आता सदर पूर्ण खंडपीठाने या संदर्भावर सुनावणी

करून निर्णय घेणे आवश्यक आहे.

२. आमच्या विचारार्थ उद्भवणारे आणि या पूर्ण खंडपीठाने उत्तर देणे आवश्यक असलेले प्रश्न खालीलप्रमाणे तयार केले आहेत :-

(i) "म. खा. शा. क. नियमावली, १९८१ यातील नियम २ (क ) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे आणि १९९२ महा. ला. जर्नल २१६ मध्ये प्रसिद्ध 'कंकूबाई श्रविकाश्रम ट्रस्ट आणि इतर- विरुद्ध- कमल जवजे दत्तात्रय खजूरकर आणि इतर' या प्रकरणामध्ये निर्णय दिल्याप्रमाणे, एखाद्या शाळेचा मुख्याध्यापक त्याच्या पदाच्या आधारे मुख्य कार्यकारी बनतो की नाही किंवा १९८८ (II) सी. एल. आर. १ मध्ये प्रसिद्ध 'श्री. गोविंद बाळ मंदिर शिक्षण संस्था -विरुद्ध- सुहास दत्तात्रय कोगेकर आणि इतर' या प्रकरणामध्ये निर्णय दिल्याप्रमाणे, व्यवस्थापनाचे निर्णय अंमलात आणण्याचा अधिकार असेल तरच असे मुख्याध्यापक मुख्य कार्यकारी अधिकारी असतील काय ?

(II)"नियम ३६(२)(ब)(i) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, मुख्याध्यापकाच्या विरुद्ध शिस्तभंगाची चौकशी करण्यासाठी व्यवस्थापनाच्या अध्यक्षांना चौकशी समितीचे सदस्य असणे आवश्यक आहे किंवा नाही, आणि १९८१ च्या नियमावलीच्या नियम २(क) च्या अर्थानुसार तो मुख्य कार्यकारी अधिकारी आहे किंवा नाही".

३. वरील याचिका करण्यास कारणीभूत असलेली तथ्ये खालीलप्रमाणे आहेत :- च्या रिट याचिका क्र. ७२२/२००६ अन्वये, शाळा व्यवस्थापनाने, दिनांक: २३/०१/२००६ रोजी शाळा न्यायाधिकरण, नागपूर यांनी अपील क्र. एस.टी. एन/२६/२००५ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाला आव्हान दिले, ज्याद्वारे शाळा न्यायाधिकरणाने, उत्तरवादी क्र. १ म्हणजे मुख्याध्यापकाचा दिनांक २८/०७/२००५ रोजीचा सेवा समाप्तीचा आदेश रद्द ठरविला. न्यायाधिकरणाने सदर सेवा समाप्ती आदेश या आधारावर रद्द ठरविला की, उत्तरवादी क्र. १ च्या विरुद्ध आरोपांचे विवरणपत्र व्यवस्थापनाच्या अध्यक्षांनी जारी केला नव्हता आणि परिणामी कंकूबाई (उपरोल्लेखित) यांच्या प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या संदर्भात, सेवा समाप्ती अवैध ठरवून चौकशी रद्द करण्यात आली. न्यायाधिकरणाने असेही सादर केले की, कंकूबाईच्या प्रकरणातील न्यायनिर्णय हा श्री. गोविंद बाळ मंदिर शिक्षण संस्थेच्या

(उपरोल्लेखित) प्रकरणातील न्यायनिर्णयापेक्षा नंतरचा होता आणि त्यामुळे कंकूबाईच्या प्रकरणातील न्यायनिर्णय त्यावर बंधनकारक होता.

४. रिट याचिका क्र. ६१६२/२००६ मध्ये, याचिकाकर्ता जो मुख्याध्यापक आहे, त्याने शाळा न्यायाधिकरणाने दिनांक ३१-०८-२००५ रोजी अपील क्र. एस.टी.सी. २५/२००१ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाला आव्हान दिले. त्याच्या अपीलातील तसेच सध्याच्या याचिकेतील आव्हानात्मक कारणांपैकी एक कारण म्हणजे कंकूबाईच्या प्रकरणातील निर्णयाप्रमाणे, याचिकाकर्ता / मुख्याध्यापक हे मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याने आरोपांचे विवरणपत्र व्यवस्थापनाच्या अध्यक्षांनी जारी करणे आवश्यक होते आणि व्यवस्थापनाच्या सचिवाने नाही, आणि त्यामुळे चौकशी फेटाळली. न्यायाधिकरणाने असेही कळविले की, श्री. काशिनाथ निखाडे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून व्यवस्थापनाद्वारे नियुक्ती करण्यात आली होती आणि १९८१ च्या नियमावलीच्या नियम २(क) च्या अर्थानुसार, याचिकाकर्त्याला व्यवस्थापनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचे अधिकार देण्यात आल्याचे दाखविण्यास तो अयशस्वी ठरला. परिणामी, न्यायाधिकरणाने त्याची अपील फेटाळली.

५. आम्ही रिट याचिका क्र. ७२२/२००६ मधील याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता श्री. बी. जी. कुलकर्णी आणि श्री. परचुरे आणि उत्तरवादी क्र. १ च्या वतीने अधिवक्ता श्री. गोडे, तसेच रिट याचिका क्र. ६१६२/२००६ मधील याचिकाकर्त्याच्या वतीने अधिवक्ता श्री. परचुरे आणि उत्तरवादी क्र. १ च्या वतीने श्री. जिभकाटे आणि दोन्ही याचिकेत, उत्तरवाडी क्र. २ च्या वतीने, सहाय्यक सरकारी वकील श्रीमती भारती डांगे, यांचे म्हणणे ऐकले.

६. रिट याचिका क्र. ७२२/२००६ मधील याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता श्री.कुलकर्णी यांनी सादर केले की, श्री. गोविंद बाळ मंदिर शिक्षण संस्थेच्या (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाने घेतलेला दृष्टीकोण योग्य आहे. श्री. कुलकर्णी यांनी संबंधित नियमांकडे आमचे लक्ष वेधले आणि सादर केले की, या न्यायालयाने कंकूबाईच्या या न्यायालयाने कंकूबाईच्या प्रकरणात घेतलेला दृष्टीकोण योग्य कायदा मांडत नाही.

७. उत्तरवादी क्र. १ च्या वतीने विद्वान अधिवक्ता श्री. गोडे यांनी सादर केले की,

कंकूबाईच्या प्रकरणात घेतलेला दृष्टीकोण योग्य आहे. त्यांनी पुढे सादर केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी च्या व्याख्येत 'सह-उत्तरवादी' समाविष्ट आहे आणि माध्यमिक शाळा संहितेच्या नियम ९.१ अनुसार,प्रत्येक मान्यता प्राप्त शाळेचा मुख्याध्यापक 'सह-उत्तरवादी' म्हणून काम करेल. परिणामी, कंकूबाईच्या प्रकरणात निर्णय दिल्याप्रमाणे आणि माध्यमिक शाळा संहितेच्या नियम ९.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मुख्याध्यापक हे 'सह-उत्तरवादी' असल्याने, नियमावलीच्या नियम २(क) अन्वये, ते मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. श्री. गोडे यांनी पुढे सादर केले की, सचिव, विश्वस्त, सह-उत्तरवादी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्यासाठी व्यवस्थापनाने अधिकार देणे आवश्यक नाही, कारण त्यांच्या मते, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची व्याख्या सचिव, विश्वस्त, सह-उत्तरवादी हे मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याचे दर्शविते. त्यानंतर त्यांनी असा युक्तिवाद केला की, जर व्यवस्थापनाला इतर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही नावाने अधिकार प्रदान करायचे असतील, तर अशा व्यक्तीला विशेषत: व्यवस्थापनाने अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी कंकूबाईच्या प्रकरणात घेतलेला दृष्टीकोण योग्य आहे, असे सांगून समापन केले.

८. उत्तरवादी क्र. २ च्या वतीने, सहाय्यक सरकारी वकील श्रीमती डांगरे (दोन्ही याचिकांमध्ये) यांनी सादर केले की, या न्यायालयाने गोविंद बाळ मंदिर शिक्षण संस्थेच्या (उपरोल्लेखित) प्रकरणात घेतलेला दृष्टीकोण योग्य आहे. तिने सादर केलेल्या निवेदनाच्या समर्थनार्थ, तिने नियमावलीच्या नियम ३३ च्या उप-नियम ४(१) वर विश्वास दर्शविला.

९. विद्वान वकिलांनी केलेल्या निवेदनाचा विचार करण्यापूर्वी, कायदे आणि नियमांमधील काही तरतुदींवर बारकाईने दृष्टी टाकणे योग्य ठरेल. अधिनियमाचे कलम २(ग) खालीलप्रमाणे आहे :-

> "२(ग) "शाळेचे मुख्याध्यापक" किंवा "मुख्य" म्हणजे, कोणत्याही नावाने ओळखली जाणारी, कोणत्याही व्यवस्थापनाद्वारे चालविण्यात येणाऱ्या आणि या अधिनियमांतर्गत मान्यताप्राप्त किंवा मान्यताप्राप्त मानल्या जाणाऱ्या शाळेची शैक्षणिक आणि प्रशासकीय कर्तव्ये आणि कार्ये पाहणारी प्रभारी व्यक्ती ज्यामध्ये

प्राचार्य, उप-प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, सहाय्यक मुख्याध्यापक, सहाय्यक मुख्याध्यापिका किंवा अधीक्षक यांचा समावेश आहे;

नियम २(क) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची व्याख्या अशा प्रकारे करतो :-

"मुख्य कार्यकारी अधिकारी' म्हणजे सचिव, विश्वस्त, सह-उत्तरवादी किंवा व्यवस्थापक वर्गाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकार दिलेली इतर कोणत्याही नावाने ओळखली जाणारी व्यक्ती".

वरील व्याख्येवरून हे स्पष्ट आहे की, सचिव, विश्वस्त, सह-उत्तरवादी किंवा कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीला व्यवस्थापनाचे निर्णय अंमलात आणण्यासाठी शक्ती प्रदान करणे हे व्यवस्थापनाचे काम आहे. व्यवस्थापनाकडून एखाद्या व्यक्तीला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून विनिर्देशपूर्वक कार्य करण्याची शक्ती प्रदान करण्याची सकारात्मक कृती ही पूर्वकल्पित आहे. नियम १५ गोपनीय अहवाल लिहिण्याशी संबंधित आहे आणि उप-नियम (१) खाली उद्धृत केलेल्या बाबींशी संबंधित आहे :-

"दरवर्षी अनुसूची "ग" मधील संबंधित नमुन्यात गोपनीय अहवाल लिहिण्यात येतील. कर्मचारी व मुख्याध्यापक यांच्या संबंधातील गोपनीय अहवाल लिहिणारे प्राधिकारी हे अनुक्रमे मुख्याध्यापक व मुख्य कार्यकारी अधिकारी असतील ...... मुख्याध्यापक किंवा शिक्षक हा व्यवस्थापनाचा सचिव असेल तर त्यांच्या संबंधातील गोपनीय अहवाल व्यवस्थापनाच्या अध्यक्षाकडून लिहिला जाईल.

(२) कर्मचारी व मुख्याध्यापक यांच्या बाबतीत अशा प्रकारे लिहिण्यात आलेल्या गोपनीय अहवालाचे परीक्षण अनुक्रमे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून व व्यवस्थापक वर्गाच्या अध्यक्षाकडून केले जाईल. अध्यक्षाने लिहिलेल्या मुख्याध्यापकांच्या किंवा शिक्षकांच्या गोपनीय अहवालाचे परीक्षण व्यवस्थापन समितीकडून केले जाईल."

नियम १६(१) उद्धृत करणे देखील आवश्यक आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे :-

"हक्क म्हणून रजा मागता येणार नाही. नैमित्तिक रजेव्यतिरिक्त रजा मंजूर करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचा विवेकाधिकार (i) (मुख्याध्यापक वगळून

अन्य) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाच्या बाबतीत शाळा समितीकडे व (ii) मुख्याध्यापकाच्या बाबतीत, व्यवस्थापकवर्गाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

नियम १६(४) खालील प्रमाणे आहे :-

"मुख्याध्यापकाशिवाय इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गास मुख्याध्यापकांकडून व मुख्याध्यापकास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून व मुख्याध्यापक स्वतः च मुख्य कार्यकारी अधिकारी असेल तर व्यवस्थापकवर्गाकडून नैमित्तिक रजा मंजूर करता येईल...

नियम १८(१) जे सेवामुक्ती प्रमाणपत्राशी संबंधित आहे, ते खालीलप्रमाणे आहे :-

"जो कर्मचारी रीतसर नोटीस देऊन सेवा सोडील किंवा ज्या कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात आली असेल, अशा (स्वतः मुख्याध्यापक सोडून अन्य) कर्मचाऱ्याला, मुख्याध्यापक अनुसूची "ह " मधील नमुन्यात सेवामुक्ती प्रमाणपत्र देईल. मुख्याध्यापकाच्या बाबतीत असे सेवामुक्ती प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून देण्यात येईल आणि मुख्याध्यापक हा स्वतः च मुख्य कार्यकारी अधिकारी असेल तर अध्यक्षाकडून देण्यात येईल."

नियम ३३(४) खालीलप्रमाणे आहे :-

"निलंबनाधीन कर्मचाऱ्याला *मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या* पूर्वमान्यतेशिवाय, निलंबनाच्या कालावधीत मुख्यालय सोडता येणार नाही. असा कर्मचारी जर *मुख्याध्यापक* आणि *मुख्य कार्यकारी अधिकारीही* असेल तर त्याला आवश्यक ती `पूर्वमान्यता अध्यक्षाकडून मिळवावी लागेल".

१०. १९८१ च्या नियमावलीतील अनुसूची "ड " ज्यामध्ये नियुक्तीसंबंधी तरतुदी आहेत, ते खालीलप्रमाणे आहे :-

**अनुसूची 'ड'**

[ नियम ९(५) पहावे ]

**नियुक्ती आदेश**

क्र. दिनांक

कडून

प्रति,

श्री./श्रीमती ................................

आपल्या दिनांक ............ च्या अर्जाच्या संदर्भात याद्वारे आपणास कळविण्यात येत आहे की, दिनांक ............ पासून किंवा आपण रुजू व्हाल त्या दिनांकापासून आपली ............ या पदावर रुपये ........... या श्रेणीत दरमहा ......... या वेतनावर नियुक्ती करण्यात येत आहे. शासनाने विशेषकरून वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे आपणास स्थानिक पूरक भत्ता, घरभाडे भत्ता आणि महागाई भत्ता यासारखे भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

२. * आपली नियुक्ती ही रजा प्रतिनियुक्ती या निमित्त रिक्त झालेल्या पदावर ............. महिना/वर्ष पासून .............. पर्यंतच्या कालावधीसाठी अगदी तात्पुरत्या स्वरूपाची आहे. वरील कालावधी संपल्यावर कोणत्याही सूचनेशिवाय आपली सेवा समाप्त होईल.

किंवा

आपली नियुक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीकरिता केलेली आहे.

३. आपल्या नोकरीच्या अति आणि सेवेच्या शर्ती ह्या महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन कायदा, १९७७ आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांमध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.

४. पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत आपणाला डॉ.........१ यांच्याकडून वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल. ज्या डॉक्टरांचे नाव वर उल्लेखिलेले आहे, त्यांच्याकडून शारीरिक पात्रता प्रमाणपत्र मिळण्याच्या शर्तीवर आपली नियुक्ती करण्यात येत आहे.

५. कृपया या नियुक्ती आदेशाची पोच द्यावी आणि हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून

.............. दिवसांच्या आत नियुक्ती स्वीकारण्याबाबतचे उत्तर कळवावे.

६. परिच्छेद ५ मध्ये दर्शविलेल्या कालावधीच्या आत आपण नियुक्ती स्वीकारल्याबाबत उत्तर न मिळाल्यास, हा आदेश रद्द समजण्यात येईल.

आपला विश्वासू,

* मुख्याध्यापक आणि शाळा समितीचा सचिव (मुख्याध्यापक /सहाय्यक-मुख्याध्यापक या व्यतिरिक्त शाळेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांच्या नियुक्ती आदेशाच्या बाबतीत)

[ मुद्रा]  * मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्याध्यापक/ सहाय्यक-मुख्याध्यापक यांच्या नियुक्ती आदेशाच्या बाबतीत)

------------------------------

* लागू नसेल तो मजकूर खोडवा.

१. व्यवस्थापनाद्वारे नाव देण्यात येईल. १९८१ च्या नियमावलीतील अनुसूची 'आय' ज्यामध्ये मुख्याध्यापकांच्या कर्तव्यांच्या बाबतीत  तरतूद दिलेली आहे, ती खालीलप्रमाणे आहे :-

**अनुसूची 'आय'**

[ नियम २२(१) पहावे]

कर्मचाऱ्यांची कर्तव्ये

१. मुख्याध्यापकांची कर्तव्ये

(१) ..........................

(२) सामान्य प्रशासकीय बाबींशी संबंधित कर्तव्ये-

मुख्याध्यापक हा-

आपल्या सहाय्यकांच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवील आणि त्याच्या कामात समन्वय साधील; त्यांची कार्यक्षमता व शिस्त याविषयी उत्तरदायी असेल आणि आपल्या सहाय्यकांनी गैरवर्तणूक किंवा शिस्तभंग केल्याचे त्याच्या निदर्शनास आल्यास, अशा प्रकरणांचा अहवाल, व्यवस्थापनाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठवील .

११. वरील नियमांचा काळजीपूर्वक विचार केल्यावर आम्हांला असे आढळले की, मुख्याध्यापक हा फक्त मुख्याध्यापक आहे आणि तो मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधीन असतो. तथापि, मुख्याध्यापकाला व्यवस्थापनाने जर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अधिकार दिले असतील, तर तो अध्यक्षांच्या अधीन होतो.

१२. आता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची व्याख्या पाहिल्यावर आम्हाला असे आढळले की, उक्त व्याख्यामध्ये 'सह-उत्तरवादी' या शब्दानंतर 'किंवा' हा शब्द येतो. विधिमंडळाच्या स्पष्ट हेतूला प्रभाव देण्यासाठी 'किंवा' शब्द आणि 'आणि' हे शब्द काही वेळा उलट म्हणून वाचले जातात, हे सुनिश्चित आहे. (२००२) १ एस.सी.सी. ७४१ मध्ये प्रसिद्ध फकीर मोहम्मद (मय्यत) तर्फे कायदेशीर वारस-विरुद्ध-सिता राम च्या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद ६ आणि ७ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले :-

> “जमीनमालकाच्या विद्वान वकिलांनी मांडलेल्या व्याख्येशी सहमत होणे आम्हांला कठीण वाटते. आमच्या मते उप-कलम ३ चे खंड (अ) आणि (ब) हे 'किंवा' या शब्दाने वेगळे केले आहेत, जे विसंगत आहे आणि घरमालकाच्या चुकीसाठी दोनपैकी कोणत्याही पद्धतीद्वारे पैसे भरण्यात अयशस्वी झाल्यास, भाडेकरूला न्यायालयात भाडे जमा करणे शक्य होईल आणि अशी ठेव हि एक वैध ठेव असेल, जी कलम १९-अ च्या उप-कलम (४) च्या अर्थान्तर्गत देय भाड्याची भरणा किंवा भाडे सुपूर्त करणे मानली जाईल. कलम १९-अ च्या उप-कलम (३) च्या सुरुवातीच्या भागात, न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय पैसे भरण्याच्या तीन पद्धतींची तरतूद आहे, जे पुढीलप्रमाणे आहे :- (i) घरमालकाला भाडयाची वैयक्तिक भरणा (ii) पोस्टल मनीऑर्डर (टपाल खात्याच्या धनप्रेष) द्वारे रक्कम पाठविणे, (iii) देय भाडे बँकेत जमा करणे. त्यामध्ये "किंवा" या शब्दाचा वापर कायदेशीर हेतू प्रकट करतो की, अशी वैयक्तिक, पैसे पाठविणे किंवा जमा करणे ह्या भरणा करण्याच्या तीन पर्यायी पद्धती आहेत. या निष्कर्षाला उप-कलम (४) च्या कायदेशीर मसुद्याद्वारे बळकट केले जाते, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की, भाडेकरूच्या देय भाड्याची भरणा करण्याचे किंवा भाडे सुपूर्त करण्याचे दायित्व ज्याची उप-कलम (१) मध्ये पूर्व-

कल्पना दिलेली आहे, ते पूर्ण झाले असे मानले जाईल,जर सदर देय भाडे उप-कलम (३)मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पद्धतीद्वारे भरले गेले, पाठविले गेले किंवा जमा केले गेले म्हणजेच वैयक्तिकरीत्या पैसे दिले गेले किंवा पोस्टल मनीऑर्डर द्वारे पाठविले गेले किंवा बँकेत जमा केले गेले. तथापि,उप-कलम (३) च्या खंड (क) मध्ये भरणा करण्याच्या अनेक पद्धतींबद्दल बोलताना, पोस्टल मनीऑर्डर द्वारे पैसे पाठविण्याच्या आणि बँक खात्यात जमा करण्याच्या पद्धतींमध्ये 'आणि' हा शब्द वापरला गेलेला आहे, ज्याचा संदर्भ विसंगत म्हणून वाचला पाहिजे. हे सुनिश्चित आहे की, 'आणि' हे 'किंवा' म्हणून वाचण्यास सक्षम आहे, जर संदर्भ मागणी करीत असेल, तर ते तसे वाचले जावे. एकसंध अन्वयार्थ लावण्याचे नियम देखील खंड (क) मध्ये सांगितलेल्या 'आणि' ला 'किंवा' म्हणून वाचले जात आहे, असे सूचित करतो. असे न केल्यास, कलम १९-अ च्या उप-कलम (३) च्या खंड (अ) आणि (ब) आणि उप-कलम (४) आणि उप-कलम (३) च्या खंड (क) यांच्यात स्पष्ट संघर्ष होईल.

'किंवा' हा शब्द सामान्यतः विसंगत असतो आणि 'आणि' हा शब्द सामान्यतः संयोगात्मक असतो. परंतु संदर्भातून उघड झालेल्या विधिमंडळाच्या स्पष्ट हेतूला परिणाम देण्यासाठी काही वेळा ते उलट म्हणून वाचले जातात. जर त्याच कायद्याचा इतर काही भाग किंवा स्पष्टपणे लिहिलेल्या कायदेशीर हेतूने ते करणे आवश्यक असेल तर "किंवा" हे "आणि" म्हणून आणि त्याउलट वाचण्यास परवानगी आहे."

ट्रस्टमध्ये किमान सात विश्वस्त असतात आणि एकापेक्षा जास्त सचिव (ज्यांना संयुक्त सचिव देखील म्हणतात) किंवा एकापेक्षा जास्त सह-उत्तरवादी असू शकतात या वस्तुस्थितीची आम्हाला जाणीव आहे. जोपर्यंत आपण मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या व्याख्येत "किंवा" हे "आणि" म्हणून वाचत नाही, तोपर्यंत व्यवस्थापनाला त्याचे निर्णय अंमलात आणण्यासाठी त्याच्या पसंतीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला प्रदान करण्याची/ नियुक्त करण्याची परवानगी संबंधी नियम बनविणाऱ्या प्राधिकाऱ्याचा हेतू पूर्ण होऊ शकत नाही. वरील गोष्टींव्यतिरिक्त, या आधी आमच्या लक्षात आलेल्या पदानुक्रमानुसार, शाळेचा

मुख्याध्यापक हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिनस्त असतो आणि सह-उत्तरवादी म्हणून जर मुख्याध्यापक आपोआप मुख्य कार्यकारी अधिकारी बनणार असेल, तर व्यवस्थापनाला शाळा प्रमुख, सचिव किंवा विश्वस्त यांचे व्यतिरिक्त, त्याच्या आवडीचे मुख्य कार्यकारी अधिकारी ठेवण्याची परवानगीसंबंधी नियम बनविणाऱ्या प्राधिकाऱ्याचा हेतू स्पष्टपणे पराभूत होईल. पुढे जेव्हा एखाद्या विश्वस्तमंडळात एकापेक्षा जास्त विश्वस्त असतात, तेव्हा प्रत्येकजण मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याचा दावा करतो, ज्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. जेव्हा व्यवस्थापन एकापेक्षा जास्त शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालये चालवितो, तेव्हा एकापेक्षा जास्त मुख्याध्यापक असतील आणि अशा परिस्थितीत सर्व शाळांचे मुख्याध्यापक 'मुख्य कार्यकारी अधिकारी' असल्याचा दावा करतील. त्यामुळे 'किंवा' हा शब्द काहीसा अयोग्य वाटेल. (२००१) ४ एस.सी.सी. ५३४ मध्ये प्रसिद्ध "गुरुदेव दत्ता व्ही.के.एस.एस.एस. मर्यादित आणि इतर - विरुद्ध- महाराष्ट्र राज्य आणि इतर" या प्रकरणातील परिच्छेद २६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने पाळलेल्या व्याख्येच्या सुवर्ण नियमाचे आम्ही पालन करतो. ते खालीलप्रमाणे आहे :-

> "पुढे आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की, कायद्याच्या व्याख्येचे हे एक मूल तत्व आहे की कायद्याचे शब्द त्यांच्या नैसर्गिक, सामान्य किंवा प्रचलित अर्थाने समजून घेतले पाहिजेत आणि त्यांच्या व्याकरणात्मक अर्थानुसार अर्थ लावला गेला पाहिजे, जोपर्यंत अशा अन्वयार्थ लावल्यामुळे काही विसंगती होत नाही किंवा जोपर्यंत त्या संदर्भात किंवा कायद्याच्या उद्देशात काहीतरी उलट सुचवत नाही. सुवर्ण नियम असा आहे की, कायद्यातील शब्दांना प्रथमदर्शनी त्यांचा सामान्य अर्थ दिला गेला पाहिजे. अन्वयार्थ लावण्याचा आणखी एक नियम असा आहे की, जेव्हा कायद्यातील शब्द स्पष्ट, सोपे आणि असंदिग्ध असतात, तेव्हा न्यायालये परिणामांची पर्वा न करता त्या अर्थाला प्रभावी करण्यास बांधील असतात. असे म्हटले जाते की, शब्द स्वतःच कायदा देणाऱ्याचा हेतू सर्वोत्तमपणे घोषित करतात. विधिमंडळाने वापरलेल्या प्रत्येक शब्दाला अर्थ देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत या तत्वाचे न्यायालयांनी पालन केले आहे आणि कायद्याच्या बुद्धीगम्य परिस्थितीत त्यांचा योग्य वापर होऊ शकत

असल्यास, कायद्यातील शब्दांना प्रतिकूल आधिक्य म्हणून बाजूला सारणे हे अन्वयार्थ लावण्याचे योग्य तत्व नाही.

१३. १९८१ च्या नियमावलीतील नियम २(क) ची भाषा सोपी आणि असंदिग्ध आहे आणि त्यासाठी सोपे आणि शब्दशः अर्थ लावणे आवश्यक आहे. ए.आई.आर १९७३ एस.सी. १०३ मध्ये प्रसिद्ध मेसर्स हिरालाल रतन लाल-विरुद्ध-विक्रीकर अधिकारी, विभाग III, कानपूर यांच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे मानले की-

> "वैधानिक तरतुदीचा अर्थ लावताना,अन्वयार्थ लावण्याचा पहिला आणि सर्वांत महत्वाचा नियम म्हणजे साहित्यिक अन्वयार्थ लावणे. ती तरतूद काय म्हणते हे न्यायालयाला अगदी सुरुवातीलाच पाहावे लागेल. जर तरतूद असंदिग्ध असेल आणि त्या तरतुदीतून विधिमंडळाचा हेतू स्पष्ट होत असेल, तर न्यायालयाला कायद्यांचे अन्वयार्थ लावताना इतर नियमांची मदत घेण्याची गरज नाही. विधिमंडळाचा हेतू स्पष्ट नसेल तेव्हाच कायद्यांचे अन्वयार्थ लावण्यासाठी इतर नियमांची मदत घेतली जाते".

१४. माध्यमिक शाळा संहिता किंवा 1977 च्या अधिनियमात किंवा 1981 च्या नियमावलीत "सह -उत्तरवादी" ची कोणतीही व्याख्या आढळत नाही, हे देखील लक्षात घेणे योग्य आहे. शाळा संहितेच्या नियम 9.1 मध्ये असे म्हटले आहे की शाळेचा मुख्याध्यापक हा विभागाचा सह-उत्तरवादी म्हणून काम करेल. त्यामुळे केवळ मुख्याध्यापकच सह-उत्तरवादी असू शकतो असे गृहीत धरणे चुकीचे आहे. या प्रकरणाचा विचार केल्यावर आम्ही असे मानतो की, मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणजे व्यवस्थापनाने त्याचे निर्णय अंमलात आणण्यासाठी अधिकार दिलेली व्यक्ती असली पाहिजे, मग तो सचिव, विश्वस्त किंवा सह-उत्तरवादी कोणीही असो.

१५. १९८१ च्या नियमावलीतील नियम ३६(१)(२) असा आहे :-

> "३६(१) जर एखादा कर्मचारी [नियम २८ च्या पोट-नियम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणाबद्दल] दोषी असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल आणि व्यवस्थापकवर्गाने चौकशी करण्याचे ठरविले असेल, तर

व्यवस्थापकवर्ग रीतसर स्थापन केलेल्या चौकशी समितीमार्फत अशी चौकशी करील. अशी समिती ज्या बाबतीत जबर शिक्षा लादावयाच्या आहेत अशाच प्रकरणाबाबत चौकशी करील. याबाबतीत व्यवस्थापकवर्गाने प्राधिकृत केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी (आणि चौकशी ही जो स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी सुद्धा आहे अशा मुख्याध्यापकाच्या विरुद्ध असेल त्याबाबतीत व्यवस्थापकवर्गाचा अध्यक्ष) संबंधित कर्मचाऱ्याला किंवा मुख्याध्यापकाला अभिकथित आरोपाबाबत पोच देय नोंदणी डाकेने कळवील आणि त्याला अभिकथानपत्र मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत त्यांच्याकडून लेखी स्पष्टीकरण मागवील.

(२) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा प्रकरणपरत्वे, अध्यक्षास, कर्मचाऱ्याने किंवा पोट-नियम (१) मध्ये संदर्भित केलेल्या मुख्याध्यापकाने सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नाही असे आढळून आल्यास तो आपणास ते स्पष्टीकरण मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत ते व्यवस्थापकवर्गासमोर ठेवील. व्यवस्थापकवर्ग त्यानंतर पंधरा दिवसांच्या आत कर्मचाऱ्याविरुद्ध चौकशी करावी किंवा काय ते ठरवील आणि व्यवस्थापकवर्गाने चौकशी करण्याचे ठरविल्यास ती चौकशी पुढीलप्रमाणे नियुक्त करावयाच्या चौकशी समितीकडून केली जाईल ती समिती अशी ........................

(अ)...............................

(ब) पोट-नियम (१) मध्ये संदर्भित केलेल्या मुख्याध्यापकाच्या बाबतीत

(i) व्यवस्थापकवर्गाचा अध्यक्ष हा एक सदस्य असेल;

(ii)कोणत्याही खाजगी शाळेतील कर्मचाऱ्यांमधून एखाद्याला मुख्याध्यापकाने सदस्य म्हणून नामनिर्देशित करायचे असेल;

(iii)राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केलेल्या मुख्यध्यापकांच्या यादीमधून अध्यक्षाने निवडावयाचा एक सदस्य.

१६. वरील चर्चेच्या प्रकाशात, नियम ३६(१)(२)(ब) चे अवलोकन असे दर्शविते की, मुख्य कार्यकारी अधिकारी आरोपांचे विवरणपत्र कर्मचाऱ्याला कळवतील. जर मुख्य

कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचा अधिकार असलेल्या मुख्याध्यापकांना आरोपांचे विवरणपत्र जारी करायचे असेल , तर ते व्यवस्थापनाच्या अध्यक्षांद्वारे जारी करावे लागेल. तसेच, वरील प्रमाणे पदानुक्रम पाहता, जर आरोपांचे विवरणपत्र मुख्याध्यापकांना (ज्यांना व्यवस्थापनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचा अधिकार नाही) जारी करायचे असेल, तर आरोपांचे सदर विवरणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जारी करू शकतात आणि अध्यक्षांनी ते जारी करणे आवश्यक नाही.

१७. व्यवस्थापनाच्या अध्यक्षांना शिस्तभंगाची चौकशी करण्यासाठी, त्या मुख्याध्यापकाच्या अधिपत्याखाली जो नियम २(क) च्या अर्थानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी असेल किंवा नसेल, त्या चौकशी समितीचे सदस्य असणे आवश्यक आहे की नाही, हा दुसरा मुद्दा आता आपण हाताळणार आहोत.

१८. नियमावलीतील नियम ३६ (१)(अ) मध्ये कर्मचाऱ्यांच्या संदर्भात चौकशी समिती स्थापन करण्याची तरतूद आहे तर नियम ३६(२) (ब) मध्ये मुख्याध्यापकांसाठी चौकशी समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. कायद्याच्या कलम २(९)च्या दृष्टीने 'मुख्याध्यापक' ची व्याख्या आम्ही आधीच उद्धृत केली आहे. जर असे गृहीत धरले की, मुख्य कार्यकारी अधिकारी नसलेल्या मुख्याध्यापकाच्या बाबतीत, व्यवस्थापनाच्या अध्यक्षास चौकशी समितीचा सदस्य असण्याची आवश्यकता नाही, तर नियम ३६(२)(ब) अन्वये मुख्याध्यापकासाठी स्वतंत्र चौकशी समितीची तरतूद करणे व्यर्थ ठरेल. जर असे निर्वचन स्वीकारले गेले असेल, तर नियम ३६(२)(अ) च्या प्रयोजनार्थ शाळेचे मुख्याध्यापक एक कर्मचारी असतील आणि कलम ३६(२)(ब) च्या अनुसार स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करण्याची गरज नव्हती. हे सुनिश्चित आहे की, विधिमंडळ कोणत्याही शब्दाचा अनावश्यक वापर करत नाही. ए.आई. आर. १९८७ एस. सी. १४५४ मध्ये प्रसिद्ध *'उत्कल कॉंट्रॅक्टर्स अँड जॉइनरी प्रायव्हेट लिमिटेड - विरुद्ध- ओडिशा राज्य'* या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचे परिच्छेद ९ उद्धृत करणे योग्य ठरेल. सदर परिच्छेद ९ मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे :-

"........ज्याप्रमाणे संसदेकडून अनावश्यक अभिव्यक्ती वापरण्याची अपेक्षा केली

जात नाही, त्याचप्रमाणे संसदेने स्वतः ला अनावश्यकपणे अभिव्यक्त करणे सुद्धा अपेक्षित नाही. संसद अगदी म्हणून अर्थ नसलेला कोणताही शब्द वापरत नाही, तसेच जेथे कोणत्याही कायद्याची आवश्यकता नसते, तेथे संसद कायदे सुद्धा तयार करत नाही. कायदे करण्यासाठी संसद कायदे करते, असे गृहीत धरले जाऊ शकत नाही; तसेच ते निरर्थक कायदे करते हे सुद्धा गृहीत धरले जाऊ शकत नाही. केवळ जे सांगणे अनावश्यक आहे ते सांगण्यासाठी किंवा जे आधीच वैधपणे केले गेले आहे, ते करण्यासाठी संसद कायदे करत नाही. संसद अनावश्यकपणे कायदे करते असे गृहीत धरले जाऊ शकत नाही............."

१९. म्हणून, आम्ही असे मानतो की मुख्याध्यापकाच्या प्रकरणात, त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याचा अधिकार असेल किंवा नसेल, तरी १९८१ च्या नियमावलीतील नियम ३६(२)(ब)(i) मध्ये पूर्व-कल्पना दिल्याप्रमाणे, व्यवस्थापनाचे अध्यक्ष हे चौकशी समितीचे सदस्य असतील.

२०. निर्देशावर तदनुसार उत्तर दिले आहे. वरील निष्कर्षांनुसार निकाली लावण्यासाठी याचिका योग्य खंडपीठासमोर ठेवावी.

निर्देशावर तदनुसार निर्णय दिलेला आहे.

---

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रज़ी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X-X-X-X-X